# इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजना

- **उद्देश :**

केंद्र शासनाने विहित केलेल्या निकषांनुसार राज्यातील १८ ते ६५ वर्षाखालील दारिद्र्यरेषेतील यादीत नोंद असलेल्या व ८०% अपंगत्व असलेल्या अपंग व्यक्ती व योजनेस पात्र असतील. त्यांना मासिक रुपये २००/- निवृत्तीवेतन देय असेल.

इंदिरा गांधी राष्ट्रीय अपंग निवृत्तीवेतन योजनेमध्ये केंद्र शासनाकडून लाभार्थ्यांला रुपये २००/- प्रतिमाह देण्यात येतात. या योजनेस पूरक असलेल्या राज्य शासनाच्या संजय गांधी निराधार अनुदान योजनेमधून लाभार्थ्यांला रुपये ४००/- प्रतिमाह मिळतील. म्हणजेच या योजनांअंतर्गत लाभार्थ्यांस एकूण रुपये ६००/- प्रतिमाह निवृत्तीवेतन देण्यात येईल.

- **पात्रतेचे निकष,अटी व शर्ती :**

वय १८ ते ६५ वर्षाखालील तसेच ८०% अपंग स्त्री/पुरुष, कुटुंबाचे नाव ग्रामीण /शहरी भागाच्या दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत समाविष्ट असावे.

- **आवश्यक कागदपत्रे :**

वयाचा दाखला , रहिवासी दाखला, दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीमध्ये समावेश असल्याबद्दलचा साक्षांकित उतारा, जिल्हा शल्यचिकित्सक ( सिव्हील सर्जन ) चे अपंगत्वाचे प्रमाणपत्र.